# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठ अधिविभाग आणि संलग्न महाविद्यालयीन शिक्षकांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील परदेशातील शैक्षणिक परिषदा, कार्यशाळा, चर्चासत्रे, संमेलने इ. ना उपस्थितीसाठी अर्थसहाय्य मंजूर करण्यासाठीची सुधारित नियमावली

1. आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक परिषद /कार्यशाळा /चर्चासत्र / संमेलन इ. ना सादर करावयाच्या एकाच रिसर्च पेपरवर दोन/तीन शिक्षकांची नावे असतील तर Principal author/ Corresponding author/ Research Guide / Co-author या पैकी जे पेपर सादर करणारे शिक्षक असतील त्यांनाच आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात येईल
2. आर्थिक सहाय्यासाठीचा प्रस्ताव परिषद/कार्यशाळा/चर्चासत्र/संमेलन उपस्थितीसाठी स्विकृतीपत्र [Acceptance Letter], शोधनिबंधाच्या दोन प्रती व soft copy , मंत्रालयाचे ना हरकत प्रमाणपत्र, विषयतज्ञांची यादी, संबंधित परिषदेचे माहितीपत्रक, इ. परिपूर्ण कागदपत्रांसहित अधिविभागप्रमुखांच्या/प्राचार्यांच्या शिफारशीसहित विद्यापीठ कार्यालयात 30 दिवस अगोदर प्राप्त होणे आवश्यक आहे.
3. विद्यापीठ अधिविभाग/संलग्न महाविद्यालयीन शिक्षकांना युजीसीच्या नियमाप्रमाणे तीन वर्षातून एकदा या योजनेचा लाभ घेता येईल.
4. आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक परिषद /कार्यशाळा /चर्चासत्र /संमेलन इ. ना उपस्थित राहण्यापूर्वी विद्यापीठाची परवानगी घेणे आवश्यक आहे.
5. मा.कुलपती कार्यालय पत्र क्र.CS/GEN/37/16/(8624)/2162 दि.18 ऑगस्ट, 2016 नुसार परदेशी जाण्यासाठी Ministry of Home Affairs and Ministry of External Affairs या कार्यालयांची परवानगी घेणे आवश्यक आहे.
6. आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक परिषद/ चर्चासत्र/ संमेलन/कार्यशाळा इ. ना उपस्थित राहण्यासाठी झालेल्या एकूण खर्चापैकी जास्तीत जास्त रू. 50,000/– अथवा त्यापेक्षा कमी खर्च असल्यास प्रत्यक्ष परदेशी विमान प्रवास खर्च व नोंदणी फी अदा करण्यात येईल. युजीसीकडून अनुदान प्राप्त झाले तर युजीसीच्या नियमावलीनुसार कार्यवाही करण्यात येईल
7. आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक परिषद /कार्यशाळा /चर्चासत्र /संमेलन इ. ना उपस्थित राहिल्यानंतर, वेबसाईटवर ठेवलेल्या रिपोर्ट फॉर्मसोबत मूळ खर्चाच्या पावत्या, नोंदणी फीची मुळ पावती, प्रवास खर्चाची तिकिटे, अटेंडन्स सर्टिफिकेटची छायांकित प्रत इ.सह परिपूर्ण प्रस्ताव विद्यापीठ कार्यालयात जास्तीत जास्त 15 दिवसांमध्ये प्राप्त होणे आवश्यक आहे.
8. आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक परिषद /कार्यशाळा /चर्चासत्र /संमेलन इ. मध्ये सादर केलेला शोधनिबंध हा दोन विषयतज्ञांकडून तपासून घेण्यात येतो. दोन्ही विषयतज्ञांकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर अहवालांवर विचार करून आर्थिक सहाय्य मंजूर/नामंजूर करण्याचा अधिकार समितीचा राहील.
9. आंतरराष्ट्रीय स्तरावरील एकाच शैक्षणिक परिषद /कार्यशाळा /चर्चासत्र/ संमेलन इ. ना उपस्थितीसाठी त्याच अधिविभाग/महाविद्यालयातील दोन किंवा जास्त शिक्षकांचे प्रस्ताव प्राप्त झाल्यास सेवाज्येष्ठतेनुसार एका शिक्षकास आर्थिक सहाय्य मंजूर करता येईल. तथापि निधी उपलब्धतेनुसार अन्य प्रस्तावांचाही विचार केला जाईल.
10. विद्यापीठ अधिविभाग/ संलग्न महाविद्यालयीन शिक्षकांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषद/ कार्यशाळा/चर्चासत्र/संमेलन इ.साठी CSIR, INSA, ICSSR, DBT, DST, PURSE, UGC किंवा शासकीय व इतर संस्थांकडून प्रकल्पांतर्गत/ प्रवासासाठी आर्थिक सहाय्य प्राप्त झाले असल्यास तसे अर्जामध्ये नमूद करावे.

11. विहीत मुदतीत प्राप्त न होणारा तसेच अपु—या कागदपत्रांनिशी प्राप्त होणा—या प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही.

12. या योजनेसाठी युजीसी व विद्यापीठाची नियमावली बंधनकारक राहील.

13. संबंधित प्रस्तावांबाबतचा समितीचा निर्णय अंतिम राहील.

अध्यक्ष

(ॲकेडेमीक कमिटी नियुक्त समिती)